
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 178

वर्ष ३८ पुणे, बुधवार, १७ मे, १९७२ अंक १०





## तुमची सही,
## आणि फक्त पाच रुपये...

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये तुमचे बचत खाते सुरू करायला एवढ्या गोष्टी पुरेशा आहेत... खाते सुरू करण्यासाठी अर्ज भरणे ही एका मिनिटाची बाब आहे. आणि सुरुवातीची किमान ठेव आहे फक्त पाच रुपये!

अशा तऱ्हेनं आमचे खातेदार होणं पण किती सोपं आहे। या बचतीमुळे तुम्हाला मिळेल—एक प्रसन्न, शांत भविष्यकाल—सुस्थिर भविष्यकाळ. तुमची बचतीची सवय वाढीस लागेल. बचत करा. भविष्याची ती तरतूद आहे.

आजच बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बचत खाते सुरू करा. या वर्षांतील तुमच्या जीवनातील सगळ्यात महत्वाची घटना कदाचित तीच असेल!

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस ११७७ बुधवार पेठ पुणे २

**स्त्री-सैनिक नकोत**—"लष्करात दाखल होऊन युद्धात भाग घेण्यास हिंदी स्त्रियांना मुभा असावी" असे पत्र सिकंदराबादच्या कु. शांता अय्यर ह्यांनी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना पाठविले, त्याला पंतप्रधानांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले, "शौर्य किंवा पात्रता ह्याबाबतीत स्त्रिया कोणत्याही प्रकारे कमी नाहीत. तथापि, प्रत्येक कामाची व्यावहारिक बाजूही ध्यानात ठेवली पाहिजे. युद्धाला आवश्यक एवढा विशिष्ट प्रकारचा कणखरपणा आपल्या स्त्रियांत आहे किंवा नाही, हे मला माहीत नाही. आणीबाणीच्या वेळी पुरुष-सैनिकांचे लक्ष शत्रूशी मुकाबला करण्याऐवजी स्त्रियांच्या मदतीकडे धावण्यास गुंतले तर राष्ट्रहिताला ते बाधकच होईल."

**बर्नार्ड शॉच्या २० प्रेमपत्रांचा लिलाव** — बर्नार्ड शॉने ॲलिस लॉकेट ह्या त्याच्या प्रथम प्रेयसीस (ती एक सुंदर हॉस्पिटल नर्स होती) १८८३ ते १८८५ ह्या मुदतीत लिहिलेल्या २० प्रेमपत्रांचा लिलाव नुकताच करण्यात आला. लंडनमधील एका दुर्मिळ पुस्तक विक्रेत्याने हा संग्रह ८५,००० रुपयास घेतला.

**६३७ वृद्धविवाह**—मेक्सिकोमध्ये ६३७ वधू-वरांचे सामुदायिक विवाह नुकतेच पार पडले. काही वधू-वर इतके म्हातारे होते की, त्या समारंभास त्यांची मुले, नातवंडे, पणतवंडेही उपस्थित होती. विवाहाचा खर्च नको म्हणून ह्या वधूवरांनी इतका काळ विवाह केला नव्हता.

**बनावट चेक वटविला**— रु. २५७·५० चा एक क्रॉस्ड चेक मेसर्स मुरारजी गोकुळदास स्पि. ॲंड वी. कं. लि. ने कोठारी ट्रेडिंग कंपनीच्या नावाने पाठविला. तो वाटेत गहाळ होऊन जसानी आणि त्याचे हस्तक आर. जे. गांधी व इस्माइल ह्यांचे हाती पडला. त्यांनी चेकवरील रक्कम बदलून रु. २०,०५७·५० अशी केली. ५ ऑक्टोबर रोजी जसानीने 'भिकालाल हरिदास कोठारी' बनून आणि स्वतःला कोठारी ट्रेडिंग कंपनीचा मालक बनवून सांगली बँक लि. च्या फोर्ट शाखेत बनावट ओळखीद्वारा एक खाते उघडले. खाते उघडताना त्याने १०० रु. त्यात ठेवले. नंतर त्याने तो बनावट चेक त्यात भरला. आपल्या साथीदारांचा उपयोग करून त्याने बेअरर चेकने प्रथम २०० रु. आणि नंतर १८,००० रु. खात्यातून काढले. जसानीला अटक करण्यात आली असून पोलीस तपास चालू आहे.

**कंपन्यातील भारी पगारदार** — हिंदी कंपन्यात दरमहा ५,००० रु. पेक्षा जास्त पगार असणारे ९२३ हिंदी आहेत, तर ९६४ परदेशीय आहेत. दोन हजार रु. पेक्षा जास्त पगाराचे ९,२०९ हिंदी तर १,४५६ परदेशीय आहेत.

**१०८ व्या वर्षी पितृत्व**—मलेशियातील १०८ वर्षाच्या एका वृद्धास त्याच्या १९ वर्षे वयाच्या पत्नीपासून पुत्ररत्न प्राप्त झाले आहे. अडीच वर्षापूर्वीपर्यंत तो अविवाहित होता. त्याला आणखी एक अपत्य हवे आहे.


दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| आर्थिक स्थिती | १०-६-१९७१ रोजी |
| --- | --- |
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ — कार्यकारी संचालक
श्री. वसंतराव दादा पाटील — अध्यक्ष



तारेचा पत्ता : "मॉर्गेज"
दूरध्वनी: मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं. १: २६०३०६ नं. २: २९०००६

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. भोसले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ मे, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## आंतराष्ट्रीय राजकारणाची बदललेली रीत

आंतरराष्ट्रीय राजकारणाची रीत गेल्या दशकांत बदललेली दिसत आहे. शत्रू राष्ट्रे एकमेकांशी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष युद्ध चालू ठेवत असतानाच सन्याखालोच्या वाटाघाटीही करून राहिली आहेत. इंडोचायनातील युद्धांत उत्तर व्हिएटनामवर बाँबफेक करीत असतानाच अमेरिका पॅरिस येथील वाटाघाटींतही सोयीप्रमाणे भाग घेत आहे. हीच प्रथा इस्राइल आणि अरब-राष्ट्रगट पाळीत आहेत. चीन अमेरिकेला शिव्याशापांची लाखोली वाहातो पण प्रे. निक्सन ह्यांचे पेकिंगमध्ये स्वागत करण्यास चुकत नाही. रशिआ उत्तर व्हिएटनामला शस्त्रास्त्रे पुरवितो आणि निक्सन ह्यांच्या मॉस्को भेटीची तयारीही करत राहतो. हाच कित्ता पाकिस्तानही गिरवीत आहे. भारत पाकिस्तानच्या सरकार प्रमुखांत शिखर परिषद् भरविण्यास मान्यता देऊनही काश्मीरच्या टिटवाल भागात भारताच्या आघाडीच्या ठाण्यांवर मोठे हल्ले चढवीत आहे. पाकिस्तानचा ह्यामागे काय उद्देश आहे तो समजणे कठीण आहे. परंतु बांगला देशात झालेल्या पराभवानंतरही पाकिस्तानचे लष्कर समर्थ असल्याचा देखावा करण्याचा हेतू हल्ल्यामागे असू शकेल. ते कसेही असले तरी पाकिस्तानने आपली लष्करी ताकद पुन्हा नव्याने उभारण्यास प्रारंभ केला आहे. रावळपिंडीतील परदेशी वार्ताहरांच्या माहिती-प्रमाणे पाकिस्तानने पायदळाच्या दोन नव्या डिव्हिजन्स उभारण्यास प्रारंभ केला. प्रत्येक सेनाविभागात ४० हजार सैनिकांची भरती झाली आहे. त्याशिवाय युद्धसामग्री मिळविण्याचेही प्रयत्न जारी आहेत. फ्रान्सकडून 'मिराज' जातीची ३० जेट लढाऊ विमाने आणि चीनकडून ५० मिग लढाऊ विमाने मिळविण्याची खटपट चालू आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन कायम शांततेची खात्री झाल्याशिवाय भारत आपले लष्कर मागे घेणार नाही असे संरक्षण मंत्र्यांनी जाहीर केले आहे.

---

## आग्नेय आशिआत यंत्रसामग्रीच्या निर्यातीला वाव

एंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या एका प्रतिनिधी मंडळाने अलीकडे मलेशिआ, थायलंड आणि इंडोनेशिआ ह्या देशांचा दौरा केला. मंडळाला आपल्या दौऱ्यात असे आढळून आले की साखरकारखान्यांना लागणारी आणि विद्युत-गृहांना लागणारी यंत्रसामग्री ह्या देशांना निर्यात करणे भारताला शक्य आहे. ह्या बाबतीत भारत आता जपानशी स्पर्धा करू शकेल. आतापर्यंत अशी यंत्रसामग्री निर्यात करण्यात जपान अग्रेसर होता. परंतु जपानची स्पर्धा करण्याची शक्ती आता कमी झाली आहे. कारण जपानमधील उद्योगधंद्यांत मजुरीचा खर्च वाढला आहे आणि येनच्या पुनर्मूल्यनामुळे त्याची आंतरराष्ट्रीय पत कमी झाली आहे. अलीकडे इंडोनेशिआने स्वतःच्या साखरेच्या धंद्याचे आधुनिकीकरण करून त्याचा विस्तार करण्याचे ठरविले आहे. इंडोनेशिआच्या ह्या कार्यक्रमाचा फायदा भारताला घेता येण्या-सारखा आहे. योग्य पावले टाकल्यास भारताला ५ कोटी डॉलर्सच्या साखरेच्या यंत्रसामग्रीची मागणी मिळविता येईल. भारतामधील एंजिनिअरिंगच्या धंद्याच्या विस्ताराची इंडोनेशिआला आता अधिक चांगली कल्पना आलेली आहे. परंतु मालाचा सदोष पुरवठा आणि व्यापारी सचोटीची खालची पातळी ह्यामुळे तेथे अजूनही काहीशी साशंकता वाटत असते. भारताच्या एंजिनिअरिंगचा माल काहीसा हलगर्जीपणाने बनविला जातो आणि त्याचे पॅकिंगही नीट नसते अशा तक्रारी आहेत. म्हणून ह्या मालाची उत्पादनाच्या निरनिराळ्या पातळींवर तपासणी करण्यात येणे आवश्यक आहे. भारत-सरकारने ह्याविषयीची आपली योजना सुधारणे जरूर आहे.

---

## संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमद्वारा भारताला मदत

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विकास कार्यक्रमाच्या द्वारा भारताला ५ कोटी डॉलर्सची मदत देण्याची एक योजना आखण्यात येत आहे. ही मदत मुख्यतः शेती, उद्योगधंदे, शास्त्रीय संशोधन आणि तंत्रज्ञान ह्या क्षेत्रांत उपलब्ध करून देण्यात यावयाची आहे. येत्या पाच वर्षांत भारतात जी नवी विकासाची कामे हाती घेण्यात येणार आहेत त्यांच्याबद्दल आणि सध्या चालू असलेल्या अशा कामाबद्दल संघटनेच्या विकास कार्यक्रमाचे भारतामधील प्रतिनिधी आणि सरकारी प्रतिनिधी ह्यांच्यात प्राथमिक चर्चाही झाली आहे. पुढील महिन्यात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विकास कार्यक्रमाची बैठक जिनीव्हा येथे भरणार आहे. ह्या बैठकीत बहुधा भारताला यावयाच्या मदतीला मंजुरी देण्यात येईल. ह्या संघटनेकडून भारत फक्त मदतच घेत असतो असे मात्र नाही. संघटनेच्या निधीत भारत दरसाल ६७ लाख, ५० हजार डॉलरची भरही घालत असतो. त्याशिवाय परदेशीय

तंत्रज्ञांना शिक्षण देण्याचीही व्यवस्था करतो. ह्या शिक्षण-विषयक मदतीचा लाभ विशेषतः ब्रह्मदेश आणि इंडोनेशिआ हे देश घेतात. भारताला देण्यात येणाऱ्या मदतीत संशोधन-संस्थांना आणि विद्यापीठांना अतिशय जरूर असणाऱ्या अद्ययावत शास्त्रीय उपकरणांचा व साधनांचा समावेश असेल. त्याशिवाय दूरदर्शक पडद्यांच्या निर्मितीच्या बाबतीत तांत्रिक ज्ञान उपलब्ध करून देण्यात येईल आणि टेलिव्हिजनवर दाखविण्यासाठी चित्रित करावयाच्या कार्यक्रमाबद्दलही मार्गदर्शन करण्यात येईल. खनिज संपत्ती व भूस्तरातील पाणी ह्यांचा शोध लावण्यासाठीही तांत्रिक साहाय्य देण्यात येईल.

---

## बहुतेक रेल्वे-अपघात गाडी घसरल्यामुळे

गेल्या वर्षी भारतात ८६७ रेल्वे-अपघात झाले. नमूद करण्यात आलेल्या ह्या अपघातांपैकी ६७० अपघात ह्या ना त्या कारणाने गाडी रुळावरून घसरल्यामुळे झाले. रेल्वे मार्ग ओलांडून जाणाऱ्या रस्त्यावरील फाटकानजीक झालेल्या अपघातांची संख्या ११८ आहे. ५७ अपघात गाड्यांच्या टकरा झाल्यामुळे झाले आणि धावत्या गाडीत आग लागल्यामुळे २२ अपघात झाले. रेल्वे बोर्डाने जमविलेल्या माहितीवरून आणखी असेही दिसून येते की सर्वात कमी अपघात १९७०–७१ साली झाले. त्यांची संख्या ८४० आहे. गेल्या दहा वर्षांत १९६४–६५ सालात सर्वात जास्त म्हणजे १,२९३ अपघात झाले. गेल्या वर्षी झालेल्या अपघातांच्या संख्येत थोडी वाढ झाल्याचे दिसते. ह्याचे कारण ईशान्य रेल्वेवर झालेल्या अपघातांची संख्या एकदम वाढली. हे अपघात गाडी रुळावरून खाली घसरल्यामुळे झाले. त्यांची संख्या १९७०–७१ साली ६५ होती; ती गेल्या वर्षी १२८ पर्यंत वाढली. अपघातांच्या कारणांत रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या चुकांचे कारण सर्वांत मोठ्या प्रमाणावर दिसून येते. रेल्वेची वाहतूक नीट व सुरक्षित व्हावी म्हणून कायम स्वरूपाचे नियम करण्यात आलेले आहेत. परंतु त्याबद्दल रेल्वे कर्मचाऱ्यांची नीट समजूत झालेली नसते. रेल्वेचे अधिकारी ह्या नियमांची कसून अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांना नियमांची अधिक स्पष्ट कल्पना करून देण्याचे खास प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर अपघातांना कारण ठरू शकणाऱ्या तांत्रिक साधनांची सुधारणा घडवून आणण्याचेही काम चालू आहे. रेल्वे वाहतुकीच्या सुरक्षिततेवर ह्याचा अनकूल परिणाम होईल अशी अपेक्षा आहे.

---

## चुकीची दुरुस्ती –

दि सांगली बँक लि. चे चेअरमन, श्री. वा. त्रिं. कोरके यांचे बँकेच्या भागीदारांच्या ५५ व्या वार्षिक साधारण सभेच्या प्रसंगी झालेले भाषण "अर्थ" च्या दि. ३ मे च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. त्याच्या शीर्षकात सभेची तारीख १४ एप्रिल, १९७१ अशी चुकीने छापली गेली आहे, ती वास्तविक १४ एप्रिल, १९७२ अशी पाहिजे. ह्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहो.

—संपादक

## "स्त्री" चा ५०० वा अंक

'स्त्री' मासिकाचा ५०० वा अंक दि. १४ मे रोजी डॉ. सरोजिनी महिषी ह्यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रसिद्ध झाला. "'स्त्री' हे केवळ नियतकालिक नाही; 'स्त्री' हा एक प्रवाह आहे; प्रसंगी काळाच्या पुढेही वाहणारा. प्रत्येक सुजाण भगिनीच्या मनात 'स्त्री' ला स्वतंत्र स्थान आहे." असे "स्त्री : एक ऋणानुबंध" ह्या 'स्त्री' च्या ५०० व्या अंकानिमित्त प्रकाशित केलेल्या पुस्तिकेत म्हटले आहे, ते यथार्थ आहे. १ ऑगस्ट, १९३० रोजी श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांच्या संपादकत्वाखाली 'स्त्री' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला; तिचे अनुकरण करून कित्येक मासिके निघाली परंतु 'स्त्री' ने आपले नेतृत्व कायम राखले आहे. 'स्त्री' ने स्त्रियांचे मनोरंजन करण्याचे मर्यादित उद्दिष्ट कधीच स्वतःपुढे ठेवले नाही; समाजातील अग्रेसर लेखक व लेखिकांच्या वैचारिक लेखांनी स्त्री–जीवनात क्रांती घडवून आणली आहे. आता तर 'स्त्री' मध्ये मुख्यतः स्त्रियांचेच साहित्य प्रसिद्ध होत असते; म्हणजे 'स्त्री' ने स्वतःचा खास लेखकवर्ग निर्माण केला आहे. कुणाही लेखिकेला 'स्त्री' मध्ये लेख छापून येण्यात मान आणि अभिमान वाटावा, इतरांना तिचा हेवा वाटावा, एवढे महत्त्वाचे स्थान 'स्त्री' ने सतत राखले आहे. सुशिक्षित–अशिक्षित, शहरी-ग्रामीण, वयस्क-तरुण, विवाहित-अविवाहित, मिळवत्या गृहिणी, श्रीमंत-गरीब, अशा विविध क्षेत्रांतील स्त्रियांना, सर्वांना हे मासिक आपले स्वतःचेच वाटते, ह्यातच संपादनचातुर्याचे रहस्य सामावलेले आहे. स्त्रियांच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र मासिक हवे, ह्या अवस्थेच्या पुढे आता परिस्थिती गेली असून वेगवेगळ्या परिस्थितीमधील आणि वेगवेगळ्या वयाच्या स्त्रियांच्या समस्यांसाठी वेगवेगळी मासिके असण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण, वेगवेगळ्या प्रकारच्या परिस्थितीचा आणि समस्यांचा मेळ घालणे दिवसानुदिवस बिकट होत जाईल असे वाटते. प्रत्येक महिन्याचा अंक खूप आधी तपशीलवार योजून, त्याप्रमाणे लेख मिळवून, त्यांची आकर्षक मांडणी करण्याचे कठीण काम संपादक मंडळाला करावे लागते. ही योजकता फार महत्त्वाची आहे आणि त्याबाबतीत 'स्त्री' ने आपला दर्जा सतत राखला आहे इतकेच नव्हे तर त्यात अधिकाधिक वैशिष्ट्यपूर्ण प्रगती केली आहे. श्री. शंकरराव किर्लोस्करांच्या दूरदृष्टीचे, त्यांनी दीर्घकाळ 'स्त्री' ला लावलेल्या इष्ट वळणाचे आणि निर्माण केलेल्या उज्ज्वल परंपरेचे कौतुक वाटल्याखेरीज राहवत नाही.

प्रमुख संपादक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, पुणे ९.

---

## करखुडव्यांवर मनुस्मृतिकारांचा उपाय

"राजाचे (देशाचे) उपयोगी पडणारे निरनिराळे पदार्थ, तसेच धान्य वगैरे दुष्काळादिकांनी अडचणीचा प्रसंग आला असता जो व्यापारी देशांतरी त्याचा विक्रय करतो, त्याचे सर्वस्व हरण करावे."

—मनुस्मृति

## चेक्स व बिल्स ह्यांच्या कलेक्शनमध्ये सुधारणा

### इं. बँक्स असोसिएशनची योजना : सात नियमांचे पालन

बाहेरगावचे चेक्स आणि बिल्स ह्यांच्या कलेक्शनच्या सद्य:स्थितीबद्दल फारच तक्रारी आहेत; त्यांची बँकांना जाणीव आहे. वेगवेगळ्या चेंबर्स ऑफ कॉमर्सनी ही गोष्ट इंडियन बँक्स असोसिएशनच्या नजरेस आणलेली आहे. कलेक्शनला होणाऱ्या विलंबाच्या दिवसांचे व्याज बँकांनी दिले पाहिजे, अशी मागणी ऑल इंडिया डिपॉझिटर्स असोसिएशनने केलेली आहे. ठराविक कालमर्यादेत बँकांनी खातेदारांच्या खात्यात कलेक्शनची रक्कम जमा करावी नाही तर डिसऑनर झालेले चेक व बिले खातेदारांना परत यावीत, अशी शिफारस बँकिंग कमिशनने केलेली आहे.

बँकांच्या कार्यक्षमतेबद्दल जनतेचे मत बनते ते कलेक्शनबाबत येणाऱ्या अनुभवांवरून, आणि जनतेची ह्याबाबत तक्रार अधिकाधिक न्याय्य होऊ लागली आहे. कलेक्शनमधील दिरंगाईमुळे खातेदारांची फारच अडचण होते. त्यांना योग्य वेळात त्यांचे पैसे उपलब्ध होत नाहीत, इतकेच नव्हे तर ते पैसे त्यांना केव्हा उपलब्ध होतील, किंवा होतील की नाही, ह्याची माहितीही मिळू शकत नाही. तक्रारींना उत्तरे देण्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वेळ जातो तर चौकशीकडे लक्ष देण्यात आणि कलेक्शन कुठे अडले आहे ते शोधून काढण्यात कर्मचाऱ्यांचा वेळ जातो. टेलेक्स, ट्रंक कॉल्स, तारा, ह्यांमुळे खर्च वाढतो; अधिकारी व कर्मचारी ह्यांचा वेळ वाया जातो; गिऱ्हाईकही नाखूष होतात.

रेल्वेजनी सुपर एक्सप्रेस मालगाड्या सुरू केल्या आहेत. त्यामुळे बँकांमार्फत पाठविलेले कागदपत्र पोचण्यापूर्वीच माल जाऊन पोचतो आणि कागदपत्र न पाहिले जाता माल दिला जाण्याचे धोके निर्माण होतात. ज्या तारणावर बिल्स डिस्काँट केलेली असतात त्यांचे तारणच नाहीसे होण्याची ही शक्यता बँकांनी ध्यानात बाळगली पाहिजे.

ह्यावर तातडीचे उपाय योजण्यास इंडियन बँक्स असोसिएनने बँकांना उपाय सुचविले आहेत.

(१) अडचण : कलेक्शन कामाच्या मानाने स्टाफला पुरेसा वेळ न मिळणे.

उपाय : कामाच्या मानाने पुरेसा स्टाफ वेळ उपलब्ध करून देणे.

(२) अडचण : पुरेशी जागा आणि ॲडिंग मशीन्स नसणे.

उपाय : पुरेशी जागा आणि ॲडिंग मशीन्स उपलब्ध करून देणे.

(३) अडचण : (अ) कॅश किंवा क्लिअरिंग खात्याला वेळेच्या बंधनाचे नियम आहेत तसे कलेक्शनच्या कामासाठी नियम नाहीत.

(ब) अशा नियमांच्या अमलबजावणीसाठी देखरेख करणे.

उपाय : (अ) ह्यासाठी सात नियम करणे.

(ब) ते अमलात आणणे.

(हे सात नियम पुढे दिले आहेत.)

(४) अडचण : कलेक्शन आणि रेमिटन्स ह्या बाबतीत रेकॉर्ड अनेकवार करावे लागणे.

उपाय : ज्यांची जरुरी नाही अशी रेकॉर्ड्स करणे थांबविणे. वेगवेगळ्या ठिकाणी त्याच त्याच बाबी लिहिण्याची आवश्यकता नाही.

(५) अडचण : कागदपत्रांची अंतर्गत निष्कारण ये-जा. (अ) चेक-बिल दाखल होण्यापासून त्यांचा कलेक्शन खात्यापर्यंतचा प्रवास (ब) कलेक्शन खात्यापासून डिस्पॅच खात्यापर्यंतचा प्रवास (क) रिसीट खात्यापासून क्लिअरिंग, कलेक्शन आणि रिअलायझेशन खात्यापर्यंतचा प्रवास (ड) रिअलायझेशन आणि डिस्पॅच खात्यापासून रेमिटन्स खात्यापर्यंतचा प्रवास (इ) रिसीट खाते आणि क्रेडिट पास करणारे खाते ह्यांमधील प्रवास.

उपाय : बँकेतील हा प्रवास शीघ्र करण्यासाठी खास व्यवस्था करणे.

(६) अडचण : पोस्टाची दिरंगाई.

उपाय : पोस्टाऐवजी असोसिएशनच्या एअरफेड सर्व्हिसचा उपयोग करणे.

### कलेक्शनसाठी सात नियम :

(१) कलेक्शन/रेमिटन्ससाठी आलेले चेक्स व बिले एका दिवसापेक्षा जास्त काळ पेंडिंग राहता कामा नयेत.

(२) लोकल कलेक्शनसाठी आलेल्या सर्वांचे कलेक्शन त्याच दिवशी, किमानपक्षी दुसऱ्या दिवशी झालेच पाहिजे.

(३) आउट स्टेशन कलेक्शनच्या सर्व गोष्टी त्याच दिवशी, किमानपक्षी दुसऱ्या दिवशी कलेक्शनला धाडल्याच पाहिजेत.

(४) इतर ठिकाणांहून कलेक्शनसाठी आलेल्या सर्व गोष्टी लोकल क्लिअरिंग हाउस मार्फत कलेक्शनला त्याच दिवशी, किमानपक्षी दुसऱ्या दिवशी पाठवल्या पाहिजेत.

(५) लोकल क्लिअरिंग मार्फत कलेक्शन केलेल्या सर्व बाबी कोणत्याही सस्पेन्स अकौंटमध्ये न टाकता योग्य त्या कचेरीकडे त्याच दिवशी पाठविल्या पाहिजेत.

(६) हाच नियम लोकल क्लिअरिंग हाउसच्या बाहेरून कलेक्शन केलेल्या बाबींना लागू आहे.

(७) इतर कचेऱ्यांकडून आलेली रिअलायझेशन प्रोसिड्स त्याच दिवशी पार्टीच्या खात्यात जमा केली पाहिजेत.

वरील नियम पाळले गेले तर कलेक्शनचे काम लवकर होऊ शकेल. बँकांना ७ ते १० दिवसांत कलेक्शन करता येण्याला

अडचण वाटू नये. हे सर्व तातडीचे उपाय आहेत; दूरगामी सुधारणा कोणत्या करता येतील, त्याचा विचार असोसिएशन करीत आहे.

असोसिएशने कलेक्शनसाठी सात नियम सुचविले आहेत, ते अत्यंत महत्त्वाचे आहेत, आणि खातेप्रमुखांनी त्यांच्या पालनावर लक्ष देण्यावरच सबंध योजनेचे यश अवलंबून आहे सध्या ह्या संबंधात अगदी ढोबळ नियमही बहुतेक बँकांनी केलेले आढळत नाहीत. केवळ नियम केल्याने कलेक्शनचे काम सुधारणार नाही हे जसे खरे आहे, तसेच काही नियमच अस्तित्वात नसतील तर कलेक्शनचे काम सुधारणार नाही हेही खरे आहे. काही नियमांची अंमलबजावणी करणे अवघड, अशक्यही असेल; पण नियमच नसतील तर आदर्श परिस्थितीच्या मानाने वस्तुस्थिती किती निःकृष्ट आहे, हे लक्षातही येणार नाही. कॅश आणि क्लिअरिंगच्या नियमांचे बाबतीत बँकांचा अनुभव असा आहे की, नियम असले म्हणजे ते पाळण्याचा प्रयत्न तरी कर्मचारी करतात. म्हणून, कलेक्शन खात्यासाठी नियमांची आवश्यकता आहे.

---

## सिनेनटांकडून थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न

प्राप्तिकर खात्याने मुंबई येथे अनेक सिनेनटांच्या राहत्या जागेवर छापे घातले. ह्या लोकांनी प्राप्तीवरील कर मोठ्या प्रमाणात चुकविल्याची माहिती मिळाल्यावरच बहुधा असे छापे घालण्यात येतात. कर चुकवून काळा पैसा तयार होत जातो हे उघडच आहे. म्हणजे प्राप्तिकर खात्याने घातलेले छापे हे दुधारी हत्यार असते. चित्रपटात काम करणाऱ्या नटनटयांपासून त्यांनी चुकविलेली कराची थकबाकी वसूल करण्यासाठी अनेक प्रकारचे उपाय योजण्यात येत असतात. मुंबई आणि कलकत्ता ह्यां सारख्या मोठ्या शहरांतून बोलपट निर्मितीशी संबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींची प्रकरणे प्रथम एकत्र करण्यात येतात. त्यानंतर ह्या प्रकरणांसंबंधी अधिक तपासणीची चक्रे हालू लागतात. ही तपासणी अगदी कसून करण्याची दक्षता घेण्यात येते. ह्या प्राथमिक चौकशीत मोठ्या प्रमाणावर कर चुकविला गेला असल्याची शंका आल्यास ही सर्व प्रकरणे वरच्या पातळीवर पाठविण्यात येतात. नंतर त्यांची आणखी कडक तपासणी करण्यात येते. कर चुकविण्यासंबंधीचा निश्चित पुरावा सापडेल अशी खात्री झाल्यावर खात्यातर्फे छापे घालण्याचा निर्णय घेण्यात येतो. अशा प्रकारचा पुरावा सापडल्यास संबंधितावर खटले भरण्यात येतात. प्राप्तिकर खात्याची माहिती मिळवणारी यंत्रणा नट-नटयांनी चुकविलेल्या करासंबंधी शक्य ती सर्व माहिती कसोशीने संभाव्यतः मिळविते. त्यासाठी खास प्रयत्न करण्यात येतात. पुष्कळदा सिनेनट धंदेवाईक खर्चासाठी म्हणून मोठमोठ्या रकमा आपल्या हिशेबात दाखवितात. ह्या सर्वच रकमा खाते कराच्या कक्षेतून मुक्त करीत नाही.

अशा रकमांपैकी जो खर्च २,५०० रुपयांहून अधिक असेल आणि तो जर क्रास्ड चेकने केलेला नसेल तर खाते तो सोडीत नाही. त्याचप्रमाणे सिनेनटनट्यांनी आपल्या नातेवाईकांना दिलेले पैसे जर वाजवीपेक्षा अधिक वाटले तर तेही करापासून मुक्त धरण्यात येत नाहीत. कराची थकलेली बाकी वसूल करण्यासाठी खाते दंडाची आकारणी करते. कधीकधी असा दंड कर भरण्यास उशीर केल्याबद्दलही करण्यात येतो. त्याशिवाय नटांच्या बँकेतील खात्यांवर जप्ती बसविणे, नटांना इतरांकडून येणे असलेल्या पैशावर जप्ती ठेवणे, इत्यादी उपायही योजण्यात येतात. त्यांची मालमत्ताही कधीकधी जप्त करण्यात येते. इतके झाले तरी नटनट्यांकडून येणे असलेल्या करांची बाकी अजूनही खूप मोठी आहे. प्राप्तिकर खाते प्रयत्नांची शिकस्त करीत असतानाही त्याचा व्हावा तितका उपयोग होत नाही. अर्थखात्याकडील ताज्या माहितीप्रमाणे सुमारे ९३·७८ लाख रुपयांची थकबाकी अजूनही वसूल व्हावयाची आहे. ह्या हिशेबात आसाम, नागपूर, जयपूर आणि आंध्रप्रदेश ह्या प्राप्तिकर खात्याच्या विभागांचा समावेश केलेला नाही. अर्थात सिनेनटनट्यांकडून चुकविलेला कर गोळा करण्याचे प्रयत्नही एक सतत चालू असणारी बाब आहे. प्राप्तिकर खात्याच्या मताने ह्या प्रयत्नांना बरेच यशही आलेले आहे. एकूण थकबाकीपैकी बराच मोठा हिस्सा हाती लागलेला आहे. सिनेनटनट्यांबाबत खाते बरेच कडक धोरण स्वीकारीत असले तरी ते योग्य त्या ठिकाणी सवलती देण्यासही विसरत नाही. एखादा सिनेनट खरोखरच आर्थिकदृष्ट्या विपन्न स्थितीत आहे अशी खात्री झाल्यास त्याला कराची थकबाकी हप्त्या हप्त्याने देणची मुभा देण्यात येते. त्यात खात्याचीही सोय होते.

---

## हिंदुस्थान लिव्हरने परदेशी पाठविलेला नफा

हिंदुस्थान लिव्हर ह्या कंपनीने १९६९ ते १९७१ सालच्या दरम्यान आपल्या परदेशीय भागीदारांमार्फत ३३६ लाख रुपयांचा नफा परदेशात धाडला अशी माहिती लोकसभेत अर्थमंत्र्यांनी दिली. अर्थमंत्री पुढे असेही म्हणाले की ह्या कंपनीतील परदेशी भांडवलाचे प्रमाण कमी करण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात येतील. कंपनीच्या ताज्या ताळेबंदात दिलेल्या माहितीप्रमाणे ३१ डिसेंबर १९७१ अखेर ह्या कंपनीचे वसूल भांडवल १४·४४ कोटी रुपये होते. त्यापैकी १२·२८ कोटी रुपयांचे म्हणजे जवळ जवळ ८५ टके भांडवल परदेशी मालकीच्या होल्डिंग कंपनीचे होते. ही कंपनी ब्रिटिश मालकीची असून तिचे नाव युनिलिव्हर लि. असे आहे.

---

**क्रिकेटर मंत्री झाला** — पाकिस्तानचा भूतपूर्व क्रिकेट कप्तान ए. एच. करदार हा पाकिस्तानातील पंजाब प्रांताचा मंत्री झाला आहे.

# सेंट्रल बँकेच्या लंडन शाखेचा मॅनेजर, सॅमी पटेल, ह्याची शोकांतिका

### मोठी नोकरी गेली; बायकोने त्याग केला; फायदा दुसऱ्यांना झाला; तुरुंगवास भोगावा लागला

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या लंडन शाखेचा भूतपूर्व मॅनेजर सॅमी जमशेद पटेल ह्यास बँकेला फसविण्याचा आणि ठकविण्याचा कट केल्याबद्दल प्रत्येक आरोपासाठी सात वर्षाच्या कारावासाची शिक्षा लंडन येथील ओल्ड बेली कोर्टाने फर्मावली आहे. इतरही चार आरोपींना प्रत्येकी चार वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. ह्या सर्व शिक्षा एकसाथ भोगावयाच्या आहेत. त्याखेरीज आरोपीने ५,००० पौंड (सुमारे १ लक्ष रु.) दंड भरावयाचा आहे. त्याच्या सहआरोपींना म्हणजे जॉर्ज इलिअस हाउरी (शिपिंग एजंट) आणि रोबिअस वूल्फ वेक्सलर (इस्टेट ब्रोकर) ह्यांना प्रत्येकी अनुक्रमे सहा व पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. पटेलच्या वकिलाने कोर्टाकडे दयेची याचना केली होती, ती ऐकूनच कोर्टाने ह्या शिक्षा दिल्या आहेत. पटेलला फारच यातना भोगाव्या लागल्या आहेत, त्याला भवितव्य उरलेले नाही, त्याचा विवाहही संपल्यासारखाच आहे, लबाडीपासून त्याला स्वतःला फायदा झालेला नाही, इत्यादी मुद्दे त्याच्या वकिलाने मांडले. जुलै, १९७० मध्ये पटेलला ब्यूनॉस एरिसमध्ये अटक केली, तेव्हापासून त्याची पत्नी, इटालिअन जन्माची, मिकी हिने त्याची उपेक्षाच केलेली आहे. त्याचा विवाह मिलन येथे १९६२ मध्ये झाला होता. त्याचा खटला चालू असताना, ११ आठवड्यांत, ती फक्त एकदाच कोर्टात आली आणि पाच मिनिटेही थांबली नाही. शिक्षा फर्मावली त्या दिवशी ती गैरहजरच होती. पटेल आणि इतर दोघे आरोपी ह्यांना ब्रिक्स्टन तुरुंगात ठेवण्यात आले आहे. गेली दोन वर्षे पटेल त्याच तुरुंगात कस्टडीमध्ये होता. त्याला जामिनावर सोडण्याचा कोर्टाचा हुकूम होता, तरी त्याचा त्याने फायदा घेतला नाही; तुरुंगाबाहेर राहणे त्याला धोक्याचे वाटत होते. ब्यूनॉस एरिसमध्ये त्याच्यावर दोनदा भीषण हल्ले झालेले होते.

कारकून म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुंबई, येथे १९४७ मध्ये नोकरीस लागलेला, मुंबईला जन्मलेला, पटेल १९५६ मध्ये लंडनला कारकून म्हणून गेला. १ एप्रिल १९६७ रोजी त्याला मॅनेजर म्हणून नेमण्यात आले. १९६२ मध्ये त्याने ब्रिटिश नागरिकत्व घेतले, पण ही गोष्ट त्याने बँकेपासून गुप्त राखली.

पटेलची हाउरी आणि वेक्सलर ह्यांची १९६५ मध्ये भेट झाली, आणि लवकरच त्या तिघांनी बँकेला ठकविण्याचा कट रचला. वेक्सलरने पटेलला लंडनमधील एक फॅशनेबल वस्तीत घर विकत घेण्यासाठी सुमारे २,५०,००० रु. स्वतःच्या खात्यातून दिले. हाउरीने पटेलला एक मर्सिडीज गाडी बक्षीस दिली. ह्या दोघांनी हुंड्या काढल्या आणि त्यांना सेंट्रल बँकेने गॅरंटी द्यावी, अशा रीतीने पटेलने त्या दोघांची कर्जाची सोय होण्यास मदत करावी, असा त्यांनी व्यूह रचला. पटेलने बँकेच्या मुंबई येथील मुख्य कचेरीची संमती न घेता बँक गॅरंटी दिल्या त्या अर्थातच खोट्या, अनधिकृत होत्या. ह्या हुंड्यांवर इंग्लंडमध्ये उभारलेली कर्जे फेडण्यात आली.

१९६८ मध्ये इंग्लंडमध्ये कर्जे दुर्मिळ झाली तशी ह्या तिघांनी आपले कार्यक्षेत्र जर्मनीकडे वळविले. पाच हुंड्यांवर त्यांनी २ कोटी रुपये उभारले. १९६९ मध्ये सेंट्रल बँकेचे एक वरिष्ठ अधिकारी मि. नोशेर मिस्त्री लंडनला गेले तेव्हा ही ठकबाजी त्यांच्या नजरेस आली. पटेलला भारतात परतण्याचा हुकूम देण्यात आला, पण त्याने तो न पाळता आपल्या जागेचा राजीनामा दिला.

३० एप्रिल १९७० रोजी पटेल लंडनमधून गुप्तपणे निघून गेला; त्याने खोट्या नावाखाली ब्यूनॉस एरिस गाठले. दहा आठवड्यांनी तेथे तो रक्तबंबाळ अवस्थेत, आसन्नमरण स्थितीत, आढळला. त्याचे हातपाय बांधून त्याच्या छातीवर आणि पोटावर तीक्ष्ण हत्यारांनी वार करण्यात आले होते.

पोलिसांना केलेल्या निवेदनात पटेलने म्हटले होते की हाउरीने त्याला विश्रांतीसाठी ब्यूनास एरिसला धाडले होते. हाउरीने त्याच्या एका मित्राकडे उतरण्यासाठी ओळखपत्र दिले होते; बरोबर ७०० रु. रोख दिले होते. "लंडनला मिसेस पटेलला पत्रे लिहिलीस तर खबरदार" अशी त्याला तंबी देऊन एकाने त्याच्यावर दोनदा हल्ला केला होता.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाला किफायतशीर गिऱ्हाइके नसलेले हाउरी आणि वेक्सलर ह्यांच्या फायद्यासाठी हा सर्व कट करण्यात आला होता; त्यात पटेल धंद्याच्या दृष्टीने आणि वैयक्तिक नात्याने अडकलेला होता, असे फिर्यादीतर्फे सांगण्यात आले. पटेल आणि वेक्सलर ह्या दोघांनी खटल्याच्या आरंभीच आपली निर्धनता जाहीर केली, तेव्हा सरकारी खर्चाने त्यांना वकील देण्यात आला. दोघांनीही साक्षीदार दाखल केले नाहीत. ह्या उलट, हाउरीने वकील दिला आणि साक्षीदारही आणले परंतु, त्याचा काही उपयोग झाला नाही; त्यांनी रचलेल्या हकीकतीचे वाभाडे निघाले; तो एकदा कोर्टात कोसळून पडला; त्याच्यावर डॉक्टरी इलाज करावे लागले. मि. मिस्त्री हे फिर्यादी पक्षाचे प्रमुख साक्षीदार होते; त्यांची साक्ष १३ दिवस चालली.

---

टेलिफोनचे थकबाकीदार — लोकसभेचे ८३ आणि राज्यसभेचे ६० सभासद ह्यांचेकडे मिळून टेलिफोनच्या बिलांची १,१६,००० रुपयांची थकबाकी आहे. थकबाकीदारांत श्री. साळवे हे काँग्रेस पक्षीय सभासद अग्रेसर आहेत. त्यांची थकबाकी १०,२२८ रु. आहे. श्री. कृष्ण मेनन, श्री. सी. सी. देसाई, धांगध्राचे महाराज, हे इतर प्रमुख थकबाकीदार आहेत.

## कायद्याचा कीस काढण्याची सरकारी खात्यांची प्रवृत्ती

### इन्शुअर्ड पार्सलातील मालाची किंमत १·४% ने चुकीची होती.

( व. रा. रानडे, अॅडव्होकेट )

मुंबई येथील सोहनलाल संपतलाल या फर्मने बिकानेर येथील एका गिऱ्हाइकासाठी कमिशन एजंट म्हणून रुपये २४६५–१४–० या किमतीची सोन्याची नाणी खरेदी केली. त्यानंतर ती नाणी पार्सलने गिऱ्हाईकास पाठवण्यासाठी मुंबईतील रामवाडी पोस्टात पार्सल देण्यात आले. हे पार्सल २॥ हजार रुपयाला इन्शुअर्ड केले होते. हे पार्सल वाटेत गहाळ झाले व फर्मने भारतसरकारविरुद्ध रु. २४७५ मिळणेसाठी दावा लावला पोस्टखात्याने याबाबतची आपली जबाबदारी नाकारली. पोस्टखात्याचे म्हणणे असे की इंडियन पोस्ट ऑफिस अॅक्ट १८९८ च्या कलम ६ व त्या कायद्याखाली करण्यात आलेल्या नियमांपैकी नियम ८१ ( ग ) याप्रमाणे फर्मने पार्सल इन्शुअर्ड करण्याच्या दिवशी पार्सलमधील मालाची नेमकी किंमत किती होती हे नमूद केले पाहिजे. परंतु फर्मने चुकीची किंमत दाखवल्याने पार्सल गहाळ झाले तरीही पोस्टावर जबाबदारी येत नाही. फर्मचे म्हणणे असे की २४६५–१४–० ही प्रत्यक्ष किंमत सोडून पोस्टखर्च, इन्शुअरन्स, पॅकिंग, कमिशन इत्यादी गोष्टीपोटी ९-१-६ येवढा खर्च त्यांना आला. यात १ टक्क्याप्रमाणे होणारी फायद्याची रक्कम जमा केली तर एकूण आकडा २४९९-११-६ येवढा होतो व म्हणून सदर पार्सल २५०० रुपयाला इन्शुअर्ड केले होते.

मुंबई येथील स्मॉल कॉज कोर्टाने वादीचा दावा फेटाळून लावला. स्मॉल कॉज कोर्टाच्या एका न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध स्मॉल कॉज कोर्टाच्या फुलबेंचपुढे अपील केले असता न्यायमूर्तींनी प्रत्यक्ष किंमत व इन्शुअर्ड करण्यात आलेली रक्कम यातील फरक अतिशय थोडा आहे हे मान्य केले परंतु पोस्टखात्याच्या नियमांचे योग्य पालन झाले नाही या कारणावरून खालील निर्णय कायम केला. मुंबई हायकोर्टाने असे मत व्यक्त केले की, पार्सल इन्शुअर्ड करण्यात आल्यानंतर पार्सलमधील मालाची किंमत ही बरोबर दाखवलेली नव्हती हे सिद्ध करण्याची जबाबदारी पोस्टखात्याची आहे. ती त्यांनी पार न पाडल्याने वादी फर्मला पैसे मिळण्याचा हक्क आहे.

या निर्णयाविरुद्ध सरकारतर्फे सुप्रीम कोर्टात अपील करण्यात आले. सरकारतर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, वादीफर्मच्या म्हणण्याप्रमाणेच मालाची किंमत २४६५–१४ ही होती, २५०० रुपये नव्हे. पार्सल इन्शुअर्ड करताना मालाची दाखवलेली किंमत व मालाची प्रत्यक्ष किंमत यात तफावत असल्याने पार्सल गहाळ झाल्याबद्दल भरपाई मिळण्याचा हक्क वादी फर्मला नाही.

सुप्रीम कोर्टाने सरकारचे हे म्हणणे अमान्य केले. सुप्रीम कोर्टाने असे मत व्यक्त केले की, कोणताही कायदा व त्या कायद्याप्रमाणे करण्यात आलेले नियम यांचा अर्थ लावताना तो योग्य असा लावला पाहिजे. सरकारचा युक्तिवाद मान्य केला तर याचा अर्थ असा होईल की पार्सल इन्शुअर्ड करताना दाखवलेली किंमत व त्या मालाची प्रत्यक्ष किंमत यात एक पैशाचाही फरक पडला व असे पार्सल गहाळ झाले तर पार्सल पाठवणाऱ्याला पार्सल इन्शुअर्ड केलेले असूनही काहीही नुकसानभरपाई मिळणार नाही. कायदा करताना लोकप्रतिनिधींच्या मनात अशी कल्पना निश्चितच नसणार. असा नियम करण्याचा उद्देश येवढाच की फसवणूक करण्याच्या दृष्टीने पार्सल इन्शुअर्ड करताना आतील मालाची किंमत जास्त दाखविली जाऊ नये व असे पार्सल गहाळ झाल्यास मालाच्या किमतीपेक्षा जास्त नुकसानभरपाई मिळू नये. परंतु याचा अर्थ असा नव्हे की पार्सलमधील मालाची किंमत नमूद करताना कितीही क्षुल्लक फरक पडला तरीही लगेच पार्सल इन्शुअर्ड करणाऱ्या व्यक्तीस त्याचा काहीही फायदा मिळू नये व सरकारला नुकसानभरपाई द्यावी लागू नये. समजा एखाद्या व्यक्तीला अशा गावाहून सोने पाठवावयाचे आहे की ज्याच्या जवळपास सोन्याची बाजारपेठ नाही. सोनेचांदीचे व्यवहार फक्त मोठमोठ्या शहरातून होतात आणि त्यांच्या भावात सारखे चढउतार चालू असतात. मग त्या माणसाने पार्सल इन्शुअर्ड करण्याच्या दिवशी सोन्याची निश्चित किंमत कुठून मिळवावयाची ? अर्थात याचा अर्थ असा नव्हे की त्याने कितीही भरमसाट किंमत दाखवावी. परंतु त्याने दाखवलेली किंमत शक्य ती चौकशी करून बाजारभावाच्या जवळपास असेल तर किरकोळ फरक पडला तरीही पोस्टखात्याला आपली जबाबदारी नाकारता येणार नाही.

सुप्रीम कोर्टाने भारत सरकारचे अपील खर्चासुद्धा फेटाळून लावले.

या सर्व प्रकरणात वाद असलेली रक्कम केवळ अडीच हजार रुपये एखाद्या इन्शुअरन्स कंपनीने माल हरवला येवढ्या खात्रीवर काहीही खळखळ न करता पैसे दिले असते. परंतु कायद्याचा सोपा व सरळ अर्थ न लावता त्यातून श्लेष काढून त्याद्वारे आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न पोस्टखात्याने केला. यासाठी प्रकरण थेट सुप्रीम कोर्टापर्यंत गेले. यात मोठा तत्त्वाचा प्रश्न होता असेही दिसत नाही. परंतु सरकारी खात्यांचा दृष्टिकोन कसा असतो यावर मात्र या प्रकरणाने चांगलाच उजेड पडतो. (७४ बी. एल. आर. १५८)

( संपदा, एप्रिल १९७२ )

# शानदार समारंभाचा बेरंग

एका अत्यंत प्रगत आशियाई देशाशी सांस्कृतिक व शैक्षणिक दळणवळण वाढविण्यासाठी एक संस्था स्थापन करण्यात आली, तिचा उद्घाटनसमारंभ सायंकाळी ७-३० वाजता संपला. त्याला जोडून ८-३० वाजता एक सुप्रसिद्ध हॉटेलच्या शोभिवंत उद्यानात बूफे पद्धतीचा शानदार भोजन-समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाला खूपच गर्दी झाली होती. ९-३० वाजून गेले तरी टेबले रिकामीच होती! "मला ४० लोकांच्या भोजनाची ऑर्डर आहे; पण ७० लोक आले आहेत. सांगितलेल्या खास मेनूचे पदार्थ आयत्या वेळी कसे तयार करणार? माझ्या हॉटेलची अब्रू जाण्याचा प्रसंग आला आहे," अशी मॅनेजरची तक्रार ऐकू आली. काहीजण न जेवताच घरी गेले; प्रमुख देशीविदेशी स्त्री-पुरुष पाहुण्यांना मात्र कळ काढावीच लागली.

'भोजन-समारंभात भाग घेऊ इच्छिणारांनी तसे कळवून वर्गणीचे रु. १० ता. ३१ मार्चपूर्वी पाठवावे' अशी स्पष्ट सूचना चालकांनी निमंत्रितांना दिलेली होती. म्हणजे त्यांनी 'आर. एस. व्ही. पी.' मागविलेली होती. निमंत्रितांना उत्तर पाठविण्यास सोयीचे व्हावे म्हणून निमंत्रण-पत्रिकेबरोबर तिकीट लावलेले व पत्ता लिहिलेले कोरे पाकीट पाठविण्यात आले होते. ३० लोकांनी प्रत्यक्ष वर्गणी पाठविली; काहींनी भोजन-समारंभाच्या वेळी वर्गणी देऊ असे कळविले, तर काहींनी फोन करून आपला होकार कळविला. ह्या सर्वांची मिळून संख्या ४० झाली-म्हणून चालकांनी चाळीस लोकांच्या भोजनाची ऑर्डर दिली. पण त्यांचा अंदाज पार चुकला आणि भोजन-समारंभाचा असा बोजवारा उडाला.

ह्या सर्वाला कारण काय तर 'आर. एस. व्ही. पी.' ह्या विनंतीकडे अितक्या लोकांनी केलेले दुर्लक्ष! 'इतर पुष्कळ लोक उत्तर पाठवतीलच; तेव्हा त्यात एखाददुसरा सहज खपून जाईल.' असे काहींना वाटले; तर 'आपण स्वतःला बांधून घ्या कशाला? आयत्या वेळी पाहू. दुसरा काही कार्यक्रम नसला तर जाऊ; उगीच पैसे नकोत वाया जायला. नि शब्द मोडला असेही नको व्हायला!' असा काहींचा संभावितपणा दिसला. पण निमंत्रण करणारांच्या सोयीचा विचार त्यांनी केला नाही.

'आर. एस. व्ही. पी.' ही चार अक्षरे फ्रेंच भाषेतील 'Réspondez Sil vous plait' वाक्याच्या चार शब्दांची आद्याक्षरे आहेत. त्या वाक्याचा अर्थ 'कृपया उत्तर पाठवावे' असा आहे. 'आर. एस. व्ही. पी.' म्हणजे 'उत्तराचे पत्र' असा आपण सर्रास अर्थ करतो; उत्तर मागविलेले असले तरी फारच थोडे लोक ते पाठविण्याची तसदी घेतात. त्यामुळे वरीलप्रमाणे गोंधळ निर्माण होतात. ह्या भोजन-समारंभाला जे लोक अचानक धडकले, ते सर्वजण डिनर सूट घालून, आधुनिकतेने नटलेल्या स्त्रियांसह आलेले होते. त्यांपैकी कित्येकजण नामवंत औद्योगिक कंपन्यांतील वरिष्ठ अधिकारी होते; कित्येकांनी परदेशात वास्तव्य केलेले होते. त्यांनी केलेल्या पाश्चात्यांच्या थिल्लर अनुकरणामुळे त्यांचा बेजबाबदारपणा अधिकच घृणास्पद दिसत होता.

'आर. एस. व्ही. पी.' मागवायची, 'परंतु येत आहे' असे कळविणारे आणि न कळविणारे ह्यांच्यात काहीही फरक न करता 'कुठेही बसा' असे प्रत्येकाला सांगायचे, अशीही तऱ्हा पुष्कळ ठिकाणी आढळते. त्यामुळे शिस्तीने वागणारानाच शासन घडते. काही लोक प्रत्येक निमंत्रणाला होकार लिहून कळवितात पण जात मात्र नाहीत! 'आपले उत्तर त्यांच्या फाईलमध्ये राहते, त्यामुळे पुढील निमंत्रणाच्या वेळी आपले नाव गळत नाही' असा त्यांचा युक्तिवाद असतो.

एखाद्या महत्त्वाच्या कार्यक्रमाला मुख्य पाहुणे बराच उशीर करून येतात आणि सर्वांना ताटकळत ठेवतात, पण त्याबद्दल दिलगिरी व्यक्त न करता उलट, 'मार्गदर्शन' करीत सुटतात. स्वतःच्या कृतीच्या व्यापक, दूरगामी परिणामाकडे दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीमुळे इतरांचे, समाजाचे, देशाचे, पुढील पिढ्यांचे स्वतःच्या मुलाबाळांचेही किती नुकसान होऊ शकते ह्याची कल्पनाच येत नाही; मग त्याबद्दल कुठला खेद आणि कुठली खंत!

आधुनिक, उद्योगप्रधान जीवन एकमेकांच्या विश्वासार्हतेवर, योजनाबद्धतेवर आधारित आहे. त्याची सर्व चाके—असंख्य चाके—एकमेकांत गुंतलेली असतात. हे यंत्र कुठेही न अडकता, सुसूत्र गतीने, फिरत राहावे लागते. ठरलेले काम ठराविक वेळी ठराविक पद्धतीने सर्वजण करीत राहतील ह्या खात्रीने प्रत्येकाला आपले व्यवहार करता आले पाहिजेत. एकाच्या आश्वासनावर दुसऱ्याला आश्वासन देता आले पाहिजे. आश्वासनाची ही साखळी कुठेही तुटता कामा नये. मिळालेल्या ऑर्डरीबरहुकूम माल पुरविता आला नाही, मालाचा दर्जा राखता आला नाही, म्हणजे लाच-लुचपतीचा अवलंब करून कसेतरी भागवावे लागते. त्याचीही मग सवय लागते. जेवढी गुणवत्ता जास्त तेवढी ह्याची आवश्यकता कमी.

यंत्र कसे दिसते ह्यापेक्षा ते काम किती देते ह्यावरून त्याची किंमत केली जाते. यंत्राची कार्यक्षमता त्याच्या प्रत्येक भागाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहते. यांत्रिक युगातील मानवी यंत्रणाही कार्यक्षम हवी, त्यासाठी तिचा प्रत्येक घटक कार्यक्षम हवा. त्याखेरीज यंत्रांची क्षमता वाया जाईल. परस्परावलंबन, परस्पर सहकार्य आणि परस्पर विश्वास ह्यांची कार्यक्षमतेला जोड आवश्यक असते. नेतृस्थानी असलेल्या कित्येक लोकांतही सामाजिक जबाबदारीची जाणीव रुजलेली नाही. त्यामुळे ते स्वतःच्या कृतीला सामाजिक परिणामांचा निकष लावीतच नाहीत. त्यामुळेच प्रारंभीच्या भोजन-समारंभाच्या वेळी आर. एस. व्ही. पी. न पाठविता उपस्थित झालेल्या इतक्या लोकांच्या वागण्यात प्रौढता दिसून आली नाही.

( श्री. बा. काळे ह्यांचा 'किर्लोस्कर, मे १९७२' मधील लेख )

### निक्सन खोटे बोलले म्हणून खरे सांगावे लागले

गेल्या डिसेंबरमध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकन पत्रकार जॅक अँडरसन ह्यांनी काही गुप्त स्वरूपाची सरकारी अधिकाऱ्यांची चर्चा प्रसिद्ध करून युद्धासंबंधी अमेरिकेने पाकिस्तानची तळी उचलून धरली असे सिद्ध केले. त्यासंबंधी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या माहिती कमिटीपुढे साक्ष देताना ते म्हणाले की निक्सन ह्यांनी अमेरिकन जनतेला भारत-पाक युद्धात अमेरिका तटस्थ आहे असे सांगितले; पण ते खोटे होते. अमेरिका नि:पक्षपाती नव्हती. अमेरिका पाकच्या बाजूने धोरण ठेवीत होती आणि ह्या परिस्थितीचा विपर्यास करण्यात येत होता.अमेरिकन लोकांना सत्य सांगण्यात येत नव्हते. अमेरिकन सरकारने खरी माहिती दिली असती तर गुप्त माहिती फोडण्याचा प्रश्न उपस्थितच होऊ शकला नसता. खोट्याला खऱ्यानेच उत्तर देता येते.

### अमेरिकन स्त्रियांची स्वातंत्र्यचळवळ मूर्खपणाची

अमेरिकेत स्त्रियांना अनिर्बंध स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी चळवळ करण्यात येत आहे. पण, त्या चळवळीसंबंधी बोलतांना इस्राइलच्या पंतप्रधान गोल्डा मायर म्हणतात "ही चळवळ म्हणजे शुद्ध मुर्खपणा आहे. उलट पुरुषाबाबतच भेदभाव केला जातो. ही चळवळ हास्यास्पद आहे. कारण, स्त्रियांप्रमाणे पुरुषांना प्रसूत होता येत नाही. मातृत्वाची जाबाबदारी पडल्यामुळे स्त्रियांना भेदभावाने वागविण्यात येते असे ज्या स्त्रियांना वाटते त्यांची दखल गंभीरपणे घेण्याची गरज नाही." अमरिकेत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य भरपूर असूनही सरकारी अगर खाजगी क्षेत्रात उच्च पदावर फारशा स्त्रिया दिसून येत नाहीत हे मात्र खरे आहे.

---

### ऑ. इं. रेडिओचे जाहिरातींचे उत्पन्न

ऑल इंडिया रेडिओला १९७१–७२ मध्ये जाहिरातींच्या ध्वनिक्षेपणापासून ४·२३ कोटी रु. चे उत्पन्न झाले.

### तुटीची अर्थव्यवस्था : तिचा उपयोग, पद्धती आणि मर्यादा

वरील विषयावर गुरुवार, दि. २५ मे रोजी पुणे आकाशवाणीवर श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ', ह्यांचे इंग्रजीमधून भाषण ध्वनिक्षेपित होईल.

### पाकिस्तानी रुपयाचे अवमूल्यन

पाकिस्तानने ११ मे रोजी आपल्या रुपयाचे अवमूल्यन जाहीर केले. आता ११ पाकिस्तानी रुपये अमेरिकन १ डॉलर बरोबर होतील. ह्या पूर्वीचा अधिकृत दर ५ पाकिस्तानी रुपये = १ डॉलर असा होता.

### स्कूटरसाठी वाट पाहाणारे वाढले

स्कूटर्ससाठी आणि मोटार सायकलींसाठी ४,४२,७५६ ऑर्डरी पुरवठ्याची वाट पाहात आहेत. ३१–१२–१९७० रोजी हा आकडा ३,३३,३४७ होता.



# नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं !

# सरदार
### सोडा वाटर
### यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और दूसरी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत ३० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में ४-६ गुना मुनाफा मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं : १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साइड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र [illegible] सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

[illegible] विठ्ठलदास चेम्बर्स, १६, [illegible] स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : [illegible] कारखाना : [illegible]

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद जगत हव तस मुक्तपण भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, केम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**



Madison/TGM/7 Mar

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)